# ಕರ್ನಾಟಕ ಪ್ರೌಢಶಿಕ್ಷಣ ಪರೀಕ್ಷಾ ಮಂಡಳಿ

ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು–560003.

# KARNATAKA SECONDARY EDUCATION EXAMINATION BOARD

Malleshwaram, Bengaluru – 560003.

## 2020-21 ಸಾಲಿನ ಮಾದರಿ ಪ್ರಶ್ನೆ ಪತ್ರಿಕೆ - 2
## 2020-21 MODEL QUESTION PAPER - 2

| | |
|---|---|
| **ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ – ಮರಾಠಿ** | **ವಿಷಯ ಸಂಕೇತ : 08-M** |
| **Subject : FIRST LANGUAGE MARATI** | **Subject Code : 08-M** |
| **ಅವಧಿ : 3 ಗಂಟೆ 15 ನಿಮಿಷ** | **ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100** |
| **Time : 3 hrs. 15 minutes** | **Max. Marks : 100** |

**ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿಗಳಿಗೆ**
**Regular Fresh**

---

## विद्यार्थ्यांना सामान्य सूचना :

1) प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी आणि वस्तुनिष्ठ प्रकारचे 45 प्रश्न आहेत.

2) प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील (बंद) करण्यात आली आहे. परीक्षा सुरु झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.

3) बहुपर्यायी आणि वस्तुनिष्ठ या दोन्ही प्रकारच्या प्रश्नांसाठी दिलेल्या सूचनांने पालन करा.

4) उजव्या बाजूच्या कडेला (काठावर) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.

5) पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटेही दिलेली आहेत.

I. **पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा.** **6 x 1 = 6**

1. स्वर संधीमध्ये अ + आ हे वर्ण मिळून हा वर्ण येतो –
   A. आ
   B. ओ
   C. औ
   D. अः
2. "ऊन, हून" हे या विभक्तीचे प्रत्यय आहेत –
   A. पंचमी
   B. सप्तमी
   C. षष्ठी
   D. संबोधन
3. "काकांनी चोर पकडला" प्रयोग ओळखा –
   A. भावे प्रयोग
   B. कर्तरी प्रयोग
   C. कर्मणी प्रयोग
   D. यापैकी नाही
4. नावडतीचे मीठ ........ म्हण पूर्ण करा –
   A. अळणी
   B. कडू
   C. गोड
   D. तिखट
5. 'तोंडपाठ' हा शब्द या समासाचे उदाहरण आहे –
   A. तृतीया तत्पुरुष
   B. द्वितीया तत्पुरुष
   C. द्विगू
   D. कर्मधारय

6. "राम आंबा खात आहे" काळ ओळखा –

   A. पूर्ण वर्तमानकाळ

   B. अपूर्ण वर्तमानकाळ

   C. साधा वर्तमानकाळ

   D. रिती वर्तमानकाळ

**II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा योग्य संबंध लिहा. 4 x 1 = 4**

7. सासरी होणारा जाचः सासुरवास :: कल्पनेचा पलिकडे : ...................

8. प्रयोगाचे प्रकार : 3 :: शब्दांच्या जाती : ..................

9. उदास : निराश :: जाया : ...................

10. राव : रंक :: दुःख : ...................

**III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. 7 x 1 = 7**

11. हत्ती सुपासारखा असे कोणत्या अंधाला वाटले ?

12. सावित्रीबाईच्या वडिलांचे नाव काय ?

13. आक्काचे माहेर कोणते ?

14. विरहिणी म्हणजे काय ?

15. नरेंद्र कोणाच्या दरबारात कवी होते ?

16. भला जन्म हा ! या कवितेचे मूल्य लिहा ?

17. जगातले एकमेव सत्य काय ?

**IV. खालील प्रश्नांची उत्तरे सूचनेप्रमाणे लिहा. 3 x 2 = 6**

18. वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा –

   अ. ठाण मांडणे

   ब. जिव्हारी झोंबणे

19. अलंकार ओळखून लक्षणे लिहा.
    ‘ वाघासारखा माझा नवरा गेला’

20. गण पाडून वृत्त ओळखा.
    ‘गवतहि सुमभूषा दाखवी आज देही’

**V. खालील प्रश्नांची उत्तरे दोन-तीन वाक्यात लिहा. 7 x 2 = 14**

21. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा परिचय लिहा ?

22. “भजन आणि भोजन एवढचं तुम्हाला करता येतं वाटत.” संदर्भासह स्पष्टीकरण करा ?

23. आई बाबा मुलांना शाळेत का पाठवित नसत ?

24. तात्यांकडे एकूण किती एकर जमीन होती. त्यांनी ती कशी कमवली होती ?

25. ‘केशवकुमार’ यांचा परिचय लिहा ?

26. गुराख्याच्या जीवाची आग का होते ?

27. जीव मागे घोटाळला असे कवितेतील स्त्री का म्हणते ?

**VI. खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा. 1 x 3 = 3**

28. अ. जया अंगी मोठेपण, तया यातना कठीण

    ब. करावे तसे भरावे.

**VII. खालील प्रश्नांची उत्तरे पाच-सहा वाक्यात लिहा. 10 x 3 = 30**

29. आंधळयांनी हत्तीचे वर्णन कसे केले आहे ?

30. ‘शील’ या गुणाबद्दल आंबेडकर काय म्हणतात ?

31. लेखकाच्या घरी काकूंचे आगमन कसे झाले.

32. सावित्रीबाई शिक्षिका म्हणून शाळेत जाऊ लागल्यावर लोकांनी कोणत्या प्रतिक्रिया दर्शविल्या ?

33. आडावरून घागर होऊन येताना लेखक कोणत्या प्रश्नांचे ओझे घेऊन आले ?

34. हवा असलेला शकुन सांगण्यासाठी कवी कावळयाला कोण-कोणत्या गोष्टी देऊ करतो ?

35. श्रीकृष्णाच्या प्राप्तीसाठी रुक्मिणीने काय काय प्रयत्न केले ?

36. "ही बार बार तलवार येईल का पुन्हा ?" म्हणजे काय ?

37. गुराखी कृष्ण झाला नाही असे कवी का म्हणतो ?

38. 'पाठ आणि पोट यांचा झाला टाळ ' कवितेचा थोडक्यात सारांश लिहा.

**VIII. खालील प्रश्नांची उत्तरे आठ-दहा वाक्यात लिहा.** **4 x 4 = 16**

39. कमीज खाँच्या समवेत झालेल्या स्त्रियांच्या क्लब पार्टीचे वर्णन करा.

किंवा

'मदर्स युनियन' या संस्थेची माहिती लिहा.

40. गंगुबाईनी संगीत शिक्षणासाठी घेतलेले कष्ट लिहून त्यांची गुरुनिष्ठा स्पष्ट करा.

किंवा

बेळगावी काँग्रेसमधील घटनांचे वर्णन करा.

41. 'या भारतात बंधुभाव' कवितेचे सारांश तुमच्या शब्दात लिहा.

42. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा.

कवच भूमिचे आणि ..........................................

..................................................................

..................................................................

........................................... आज असे सत्कार।

किंवा

म्हटले स्वागतगीत ............................................

..................................................................

..................................................................

..............................................आज असे सत्कार।

**IX. दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** 1 x 4 = 4

43. 'सत्यमेव जयते !' हे भारताचे ब्रीदवाक्य आहे. आपल्या देशाचा पाया सत्यावर आधारलेला आहे. अनेक धार्मिक ग्रंथातून व पाठशाळेपासून आपल्या मनावर सत्य हेच परमेश्र्वर आहे असे बिंबवले जाते.

अंतिम विजय सत्याचाच होतो हेच प्रखर सत्य 'सत्यमेव जयते' या सुभाषितातून व्यक्त होतो. लहानपणापासून आपले आईवडील आपणास नेहमी सत्य बोलावे ही शिकवण देतात.

सत्यवचनी व्यक्तीला अनेकदा त्रास होतो. त्यांचे यश त्यांच्यापासून दूर जाते असे वाटते. पण अंतिम विजय त्यांचाच होतो. सत्यासाठी रामाने वैभवाचा त्याग केला आणि वनाचा रस्ता घरला, रामाचा मार्ग सत्याचा होता व रावणाचा असत्याचा. शेवटी रामाचा म्हणजे सत्याचा जय झाला.

**प्रश्न :**

अ. भारताचे ब्रीदवाक्य कोणते ? का ?

ब. अंतिम विजय कोणाचा होतो ? दाखला दया.

**X. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा.** 1 x 5 = 5

44. स्वच्छतेचे महत्व पटवून सांगणारे पत्र लहान भावास लिहा.

किंवा

आपल्या गावातील घाणीचे साम्राज्य नष्ट करण्यासाठी नगराध्यक्षांना अर्ज लिहा.

**XI. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंध लिहा.** 1 x 5 = 5

45. मोबाईल शाप किंवा वरदान

किंवा

कोरोनामुळे जनमानसात झालेला बद्दल